# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 11/01/2023 (बुधवार) सायंकाळ

---

### शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत ग्रामपंचायत शासकिय समाज मंदीर, थडीपवनी नरखेड येथे ०२/०१/२०२३ चे १४.०० ते १४.३० वा दरम्यान यातील फिर्यादी नामे— निशांत उत्तमराव वानखेडे, वय ३४ वर्ष, रा. ढवळापुर त. काटोल व्यवसाय ग्रा. पंचायत सचिव थडीपवनी हे थडीपवनी येथील ग्रामपंचायत सचिव असुन ग्रामपंचायत थडीपवनी येथे शासकिय निधी पंधरावा वित्त आयोग अंतर्गत समाज मंदीर वॉल कंपाउंड चे बांधकाम सुरु असतांना यातील आरोपी नामे— १) प्रकाश लक्ष्मण कठान, वय ५६ वर्ष, २) आसिक शेख ईसराईल शेख, वय ३० वर्ष दोन्ही रा. थडीपवनी ता. नरखेड यांनी संगणमत करुन नमुद ठिकाणी येवुन काम करीत असलेल्या मजुरांना ''काम बंद करा व न केल्यास तुम्हाला मारहाण करु'' असे धमकावून काम बंद केले. सदर कामावरती हजर असलेले ग्रामपंचायत शिपाई श्री विठोबा शेंडे व संगणक परीचालक नितीन टिपरे हे हजर होते. यातील संगणक परीचालक नितीन टिपरे हे घटनेचा व आरोपीतांचा व्हीडीओ हे त्याचे मोबाईलमध्ये बनवित असता यातील नमुद आरोपी क्र. ०१ याने ''तु जास्त शाहाना नको बनु, व्हीडीओ करणे बंद कर अन्यथा तुझा मोबाईल फोडुन टाकीन अशी धमकी देवुन शासकिय काम बंद पाडले तसेच काम सुरु केल्यास तुमच्या जिवाचे कमी—जास्त करेल. अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुद्ध कलम ३५३, २९४, ५०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी मो. नं. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर